| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २९.१०.२०२१ |
| | नोंदणी तारीख | २९.१०.२०२१ |
| | निर्णय तारीख | ०९.०५.२०२४ |
| | कालावधी | ०२ व ०६ म १० दि. |
| **MHSN170009052020** | **निशाणी क्र.** | **७५** |

**भाग अ**

| |
|---|
| **विटा येथील सत्र न्यायालयात** |
| पिठासीन अधिकारी : श्री. दिगंबर य. गौड, अतिरिक्त सत्र न्यायाधीश विटा |
| न्यायनिर्णय तारीख - ०९/०५/२०२४ |
| **सत्र खटला क्रमांक २३९/२०२४**<br>**(जुना सत्र खटला क्र.२९६/२०२१)** |
| **चिंचणी वांगी पोलीस ठाणे गु. र. नं.४३/२०२१** |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | महाराष्ट्र सरकार<br>पोलीस निरीक्षक चिंचणी वांगी पोलीस ठाणे. |
| सरकार पक्षातर्फे विधीज्ञ | :- | श्री ए.एन.कुलकर्णी<br>सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १. | मोहन महादेव साळुंखे,<br>वय ६० वर्षे, धंदा शेती,<br>रा.अंबक,ता.कडेगांव, जि.सांगली |
| | २. | विलास महादेव साळुंखे,<br>वय ५३ वर्षे, धंदा शेती,<br>रा.अंबक,ता.कडेगांव, जि.सांगली |
| | ३. | मयुर अशोक साळुंखे,<br>वय २० वर्षे, धंदा शेती,<br>रा.अंबक,ता.कडेगांव, जि.सांगली |
| | ४. | उदय मोहन साळुंखे,<br>वय २२ वर्षे, धंदा शेती,<br>रा.अंबक,ता.कडेगांव, जि.सांगली |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्रीमती एस.एम.सुळे आ.क्र.१ व ४ करिता |

| | | |
|---|---|---|
| | | विधीज्ञ श्री डी.एस.गुरव आरोपी क्र.२ व ३ करिता |

**भाग ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | : | ०७.०४.२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | : | ०७.०४.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २५.०९.२०२१ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | : | १३.०९.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी राखीव तारीख | : | ०८.०५.२०२४ |
| न्यायनिर्णय तारीख | : | ०९.०५.२०२४ |
| शिक्षा दिलेची तारीख (असल्यास) | : | शिक्षा नाही. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडलेची तारीख | ठेवण्यात आलेले गुन्हे | दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | न्यायबंदी कालावधी फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोहन महादेव साळुंखे | १७.०९.२०२१ | २४.०९.२०२१ | भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |
| २. | विलास महादेव साळुंखे | ०७.०४.२०२१ | ०७.०५.२०२४ | भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |
| ३. | मयुर अशोक साळुंखे | १४.०९.२०२१ | ०८.११.२०२१ | भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |
| ४. | उदय मोहन साळुंखे | १४.०९.२०२१ | ०८.११.२०२१ | भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |

**भाग क**

**(**क्रिमीनल मॅन्यूअल चॅप्टर ६ परिच्छेद ४४ **(iii)** प्रमाणे सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे वतीने घेण्यात आलेली साक्षीदारांची यादी**)**

**अ - सरकार पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | ३२ | मलाप्पा आप्पा कुडचे | जप्ती पंच |
| अ.सा.क्र.२ | ४१ | डॉ नागेश लक्ष्मण शिंदे | वैदयकीय अधिकारी |
| अ.सा.क्र.३ | ४९ | सुरज एकनाथ पवार | फिर्यादी |

| **क्रमांक** | **निशाणी क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.४ | ५३ | एकनाथ पंडीत पवार | फिर्यादीचे वडील |
| अ.सा.क्र.५ | ५५ | राजेंद्र एकनाथ पवार | फिर्यादीचा भाऊ |
| अ.सा.क्र.६ | ५६ | महादेव सदाशिव शिंदे | तपासी अंमलदार |

**बचाव पक्षाचे वतीने तपासलेले साक्षीदार**

| **क्रमांक** | **निशाणी क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**अभियोग पक्षातर्फे दाखल व निशाणी झालेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | ३३ | जप्ती पंचनामा |
| २. | ३४ | तहसिलदार यांचे पत्र |
| ३. | ४२ | एम.एल.सी.रजिस्टर |
| ४. | ४३ | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ५. | ४४ | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | ४५ | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ७. | ४६ | वैदयकीय अधिकारी यांना लिहीलेले पत्र |
| ८. | ४७ | फिर्यादीवरील सही |
| ९. | ५४ | सा.एकनाथ यांची सही |
| १०. | ५७ | फिर्याद |
| ११. | ५८ | तपास आदेश |
| १२. | ५९ | मुददेमाल जमा पावती |
| १३. | ६० | मुददेमाल जमा पावती |
| १४. | ६१ | कपडे जप्ती पंचनामा |
| १५. | ६२ | मुददेमाल जमा पावती |
| १६. | ६३ | कपडे जप्ती पंचनामा |
| १७. | ६४ | मुददेमाल जमा पावती |

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १८. | ६५ | सी.ए.ला पाठविलेले पत्र |
| १९. | ६६ | न्यायदंडाधिकारी यांना लिहीलेले पत्र |
| २०. | ६७ | सहयाद्री हॉस्पीटलला लिहीलेले पत्र |
| २१. | ६८ | ग्रामीण रुग्णालय चिंचणी यांना लिहीलेले पत्र |
| २२. | ६९ | फिर्यादी सुरजच्या जबाबातील अधोरेखित भाग अ |

**बचाव पक्षातर्फे शाबीत केलेले कागद**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**मुद्देमाल साहित्य**

| अ.क्र. | वस्तू क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | एम.ओ.१ | साधी माती |
| २ | एम.ओ.२ | रक्तमिश्रीत माती |
| ३ | एम.ओ.३ | लोखंडी गज |
| ४ | एम.ओ.४ | बांबू |
| ५. | एम.ओ.५ | बांबू |
| ६. | एम.ओ.६ | बांबू |
| ७. | सी | फोटो |
| ८. | डी | फोटो |
| | | |

**दोषारोपः भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये**

## न्यायनिर्णय

(अधिघोषीत दि. ०९.०५.२०२४)

प्रस्तूत प्रकरणात आरोपीची भा.द.वि.कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नुसार संपरीक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात वाद कथन असे आहे की, फिर्यादी सुरज

एकनाथ पवार यांनी दि.०७.०४.२०२१ रोजी अशी फिर्याद दिली आहे की, फिर्यादीचे कुटुंब व आरोपी यांचेमध्ये अंबक येथील गट क्र.१४२७ च्या मालकी बाबत जुना वाद होता. दि.०७.०४.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता फिर्यादी व साक्षीदार एकनाथ पंडीत पवार, राजेंद्र एकनाथ पवार व रेखा एकनाथ पवार असे सर्वजण गट नं.१४२७ मध्ये उस तोडणीसाठी गेले असता आरोपी क्र.१ ते ४ यांनी फिर्यादी व जखमी यांना पाहून तुम्हाला आज जिवंत जावू देत नाही असे म्हणून शिवीगाळी करून त्यांचे अंगावर जाऊन आरोपी क्र.१ याने त्याचे हातातील लोखडी रॉडने जखमी एकनाथ पंडीत पवार यांना जीवे मारणेचे उददेशाने त्याचे डोकीत मारले. तसेच आरोपी क्र.२ याने त्याचे हातातील काठीने राजेंद्र एकनाथ पवार यास कपाळावर मारले. फिर्यादी सुरज हा मध्ये सोडवण्यासाठी गेला असता त्याला आरोपी क्र.३ व ४ यांनी त्यांचे हातातील काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केले

३. फिर्यादी यांनी चिंचणी वांगी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

४. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिकारी यांनी केला व तपासांती सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

५. दोषारोपपत्र व पोलीस कागदपत्रांवरून आरोपींविरुध्द दोषारोप नोंदविले. आरोपींनी गुन्हयाची नाकबुली दिल्याने अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे सहा साक्षीदार तपासले. सादर पुराव्यावरून आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्याचे फौजदारी व्यवहार संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविले.

६. फिर्यादी पक्षाच्या कथनावरुन व दाखल पुराव्यावरून खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर खालील दिलेल्या कारणामीमांसाप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ४ यांनी अंबक या गावी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना अशा पध्दतीने मारहाण करून गंभीर जखमी केले की त्यामुळे त्यांचा मृत्यू होऊ शकत होता व आपलेवर खुनाचा गुन्हा दाखल झाला असता ? | नाही |
| २) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना लोखंडी रॉड व | नाही |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | काठयांनी मारहाण करून गंभीर जखमी केले ? | |
| ३) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारांना लाथाबुक्यांनी मारहाण केली ? | नाही |
| ४) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारांना शिवीगाळ केली ? | नाही |
| ५) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली ? | नाही |
| ६) | कोणता आदेश? | : अंतिम आदेशा-प्रमाणे |

## कारणमिमांसा

**युक्तीवादः**

७. अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री ए.एन.कुलकर्णी व आरोपी क्र.१ व ४ तर्फे वकील श्रीमती एस.एम.सुळे व आरोपी क्र.२ व ३ तर्फे श्री डी.एस.गुरव यांनी रेकॉर्डवर दाखल पुराव्यानुसार त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरण्यात यावा असे सांगितले.

**मुद्दा क्रमांकः १ ते ६ बाबतः-**

८. यातील अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द असा दोषारोप ठेवण्यात आला आहे की, दि.०७.०४.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता फिर्यादी व साक्षीदार एकनाथ पंडीत पवार, राजेंद्र एकनाथ पवार व रेखा एकनाथ पवार असे सर्वजण गट नं.१४२७ मध्ये उस तोडणीसाठी गेले असता आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादी व जखमी यांना लोखंडी रॉड व काठया व लाथाबुक्यांनी मारहाण, धमकी व शिवीगाळ केली.

९. सदरची बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ फिर्यादी सुरज एकनाथ पवार यांची साक्ष नोंदविण्यात आली. पण त्यांनी दि.०७.०४.२०२१ रोजी आरोपींनी संगनमताने त्याला व जखमींना लोखंडी रॉड, काठया व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे सांगितले नाही. अभियोग पक्षातर्फे

उलटतपासामध्ये त्यांना विचारता येण्याजोगे पश्न विचारले मात्र त्यातून आरोपी विरुध्द सिध्द होणारी कोणतीही बाब रेकॉर्डवर आली नाही. या उलट आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासात त्यांने त्याला व त्याच्या वडीलांना व भावाला कोणी व कसे मारले हे माहित नसल्याचे व फिर्यादीत काय लिहीले आहे हे त्याला माहित नसल्याचे सांगितले आहे. तसेच घटनास्थळावर कुठलीही हत्यारे मिळाली नसल्याचे सांगितले आहे.

१०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ एकनाथ पंडीत पवार व साक्षीदार क्र.५ राजेंद्र एकनाथ पवार यांनी देखील आपले सरतपासात सदरची घटना घडल्याचे व आरोपींनी मारहाण केल्याचे सांगितले नाही. अभियोग पक्षातर्फे तर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये त्यांना विचारता येण्याजोगे पश्न विचारले मात्र त्यातून आरोपी विरुध्द सिध्द होणारी कोणतीही बाब रेकॉर्डवर आली नाही. या उलट त्यांनी पेटलेला उस विझवताना धुरामध्ये त्यांना काही तरी लागले साक्ष दिली आहे व

११. या कामी साक्षीदार क्र.१ मलाप्पा आणाप्पा कुडचे या जप्ती पंचनाम्याच्या पंचाची साक्ष नोंदविली आहे. त्याने त्याचे समक्ष लोखंडी रॉड व काठया जप्त केल्याचे सांगितले आहे परंतू मुळात फिर्यादी व इतर साक्षीदारांनी सदरची कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितल्याने जप्ती पंचनामा जरी शाबीत झाला असला तरी आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यास पुरेसे नाहीत.

१२. साक्षीदार क्र.२ डॉ नागेश लक्ष्मण शिंदे यांनी आपले साक्षीत फिर्यादी व जखमींना तपासले व त्यांचे वैदयकीय प्रमाणपत्र जारी केल्याची साक्ष दिली आहे. परंतू फिर्यादी व जखमी यांनी अशी कोणतीही घटना घडली नसल्याची साक्ष दिली असल्याने साक्षीदार क्र.२ ची साक्ष आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करणेस पुरेशी नाही. साक्षीदार क्र.६ हे तपासी अंमलदार असून त्यांनी केलेल्या तपासाबाबत साक्ष दिली आहे.

१३. अशाप्रकारे प्रस्तुत कामी अभियोग पक्ष असे सिध्द करु शकला नाही की दि.०७.०४.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता फिर्यादी व साक्षीदार एकनाथ पंडीत पवार, राजेंद्र एकनाथ पवार व रेखा एकनाथ पवार असे सर्वजण गट नं.१४२७ मध्ये उस तोडणीसाठी गेले असता आरोपी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादी व जखमी यांना लोखंडी रॉड व काठया व लाथाबुक्यांनी मारहाण, धमकी व शिवीगाळ केली. यामुळे मुद्दा क्र. १ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी देतो व मुद्दा क्र. ६ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १) | आरोपी मोहन महादेव साळुंखे, विलास महादेव साळुंखे, मयुर अशोक साळुंखे व उदय मोहन साळुंखे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपींचा जामीन रदद करणेत येत आहे. |
| ३) | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये अपिल कालावधीसाठी व अपील दाखल झालेस त्याकामी विनाविलंब हजर राहणेच्या हमीसाठी प्रत्येकी रक्कम रु.५०००/-चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रकमेचा जामीनदार सादर करावा. |
| ४) | जप्त मुद्देमाल अपील कालावधी नंतर नाश करणेत यावा. |

(खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला)

DIGAMBER YASHWANT GAUD

Digitally signed by DIGAMBER YASHWANT GAUD
Date: 2024.05.09 17:20:25 +0530

विटा
दिनांकः ०९.०५.२०२४.

**(दिगंबर यशवंत गौड)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा**

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ आदेश / न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | संजय वि.अग्निहोत्री |
| पिठासीन अधिकारी व कोर्टचे नांव | : | दिगंबर यशवंत गौड<br>अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा |
| आदेश पारीत तारीख | : | ०९/०५/२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय टंकलेखन तारीख | : | ०९/०५/२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड तारीख | : | ०९/०५/२०२४ |